दूरशिक्षण केंद्र
दि. २७/०७/२०२०

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०– २०२१ मध्ये सुधारित करण्यात आलेल्या बी. ए. भाग ३ च्या अभ्यासक्रमाप्रमाणे स्वयं अध्ययन साहित्य तयार करणेबाबत.**

**सादर,**

सोबत अभ्यास मंडळे विभागाचे जा. क्र. SU/BOS/Humanities/1578 दि.०४/०७/२०२० रोजीचे पत्र अवलोकनार्थ.

उपरोक्त पत्रान्वये अभ्यास मंडळे विभागाने बी. ए. भाग ३ (सत्र ५ व ६) च्या Choice Based Credit System (CBCS) पध्दतीच्या अभ्यासक्रमास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिल्याचे तसेच सदरचा अभ्यासक्रम दूरशिक्षण केंद्रातर्गत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१ – २०२२ मध्ये लागू होत असल्याचे कळविले आहे.

याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, दूर शिक्षण केंद्राकडून बी. ए भाग ३ मधील मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू संस्कृत, अर्धमागधी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, व शिक्षणाशास्त्र, या विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार केले जाते. दूर शिक्षण केंद्रातंर्गत बी. ए भाग ३ साठी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक वर्ष २०२०– २०२१ मध्ये Choice Based Credit System (CBCS) पध्दतीने सुधारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे सदर विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करावे लागणार आहे. सदर स्वयं अध्ययन साहित्य तयार करणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

1. दूरशिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०१५– २०१६) तयार करण्यात आलेले बी. ए भाग ३ मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, अर्धमागधी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, व शिक्षणशास्त्र या विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१ मध्ये Choice Based Credit System (CBCS) पध्दतीने सुधारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमास उपयुक्त आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय देणेबाबत तसेच सदरचे स्वयं अध्ययन साहित्य नव्याने तयार करावयाचे झालेस स्वयं अध्ययन साहित्याच्या लेखन व संपादनाकरिता लेखक व संपादकांची नावे व सदर लेखकांकरिता कार्यशाळेचे आयोजन करावयाचे झालेस सदर कार्यशाळेसाठी तारीख व वेळ सूचित करणेबाबत संबधित विषयाच्या अभ्यास मंडळे अध्यक्षांना पत्राद्वारे कळविण्यास मान्यता असावी.
2. अभ्यास मंडळे अध्यक्षांनी स्वयं अध्ययन साहित्याच्या लेखन व संपादनाकरिता लेखक, संपादकांची नावे, तसेच सदर लेखकांनाकरिता कार्यशाळेचे आयोजन करणेसाठी तारीख व वेळ सूचित केलेस संबधित विषयांच्या कार्यशाळा आवश्यकतेनुसार ऑनलाईन पध्दतीने अथवा प्रत्यक्षरित्या दूरशिक्षण केंद्र येथे आयोजित करण्यात येतील.
3. सदर कार्यशाळांसाठी जे सदस्य प्रत्यक्ष दूरशिक्षण केंद्र येथे उपस्थित राहतील अशा सदस्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता (टीएडीए) देणेस तसेच सदरपैकी जे सदस्य कार्यशाळेकरिता स्वत:च्या/भाडोत्री वाहनाने उपस्थित राहतील व आपल्या देयकासोबत आवश्यक त्या टोल पावत्या व विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडून देण्यात येणारा गेट पास सादर करतील अशा सदस्यांच्या कार प्रवासास मान्यता असावी.
4. सदर कार्यशाळांकरिता होणारा खर्च A.59.P.17 Meeting Expenses या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल.

@ १ ते ४ मान्यतेसाठी सादर

@ मान्यतेस्तव सादर

ऑफीस सुपरवायझर 27/07/2020

27/07/20
समन्वयक / सहाय्यक प्राध्यापक

'@' मान्यतेस्तव सादर

उपकुलसचिव
27/07/2020

for
संचालक 27/07/2020

मा.कुलसचिव
28/7

मा. प्रभारी कुलगुरु
18/8